स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव**
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

# जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१४ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील स्त्री अभ्यास केंद्र, सामाजिकशास्त्र प्रशाळा आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महिला जागर सप्ताह: आत्मनिर्भर युवती अभियानाचा मंगळवार, दि. १४ मार्च रोजी समारोप झाला.

समारोपाला विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. सुनील कुलकर्णी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी सिनेट सदस्या डॉ. किर्ती कमलजा होत्या. गौतमी जगदेव, तेजश्री तायडे, अंकिता गिरासे यांनी अभिप्राय नोंदविला. डॉ. कमलजा यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग ग्रामिण भागातील महिलांच्या जनजागृतीसाठी करावा असे आवाहन केले.

सोमवारी या सप्ताहात शासनाच्या विविध योजनांबद्दल जिल्हा महिला व बालविकास समुपदेशक विद्या सोनार यांनी माहिती दिली. महिला सहायक कक्ष कार्यप्रणाली आणि शासनाच्या योजना याबद्दल त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी विभागप्रमुख डॉ. संजिवनी भालसिंग, समन्वयक डॉ. विश्रांती मुंजेवार, भाग्यश्री पाटील आदी उपस्थित होते. प्राजक्ता राजपूत हीने सुत्रसंचलन केले तर आशा तडवी हीने आभार मानले.

**बातमी क्रमांक २**

जळगाव दि. १४ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या बहि:स्थ शिक्षण आणि अध्ययन विभागाव्दारे नवीन १९ प्रमाणपत्र शिक्षणक्रम सुरू होत असून त्यासाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे.

कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या पुढाकाराने रोजगाराभिमुख शिक्षणक्रम सुरू करण्यात आले आहेत. १५ मार्चपा नवीन १९ शिक्षणक्रमासाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू केली जात आहे. हे सर्व शिक्षणक्रम ऑनलाईन पध्दतीने होणार आहेत. त्या-त्या विषयातील तज्ज्ञ आणि अनुभवी मार्गदर्शकांकडून मार्गदर्शन प्राप्त होईल. शनिवार आणि रविवार प्रत्येकी दोन तास या शिक्षणक्रमांचे ऑनलाईन वर्ग होणार आहेत. संस्कृत, उर्दू, इंग्रजी संभाषण कौशल्य, जर्मन भाषा, जापानी भाषा, फ्रेंच भाषा, स्पॅनिश भाषा, जर्मन भाषा A1, जर्मन भाषा A2 स्तर, मोडीलिपी या शिक्षणक्रमांसोबत लिंग संवेदनशीलता, सायबर गुन्हे आणि कायदे, बौध्दिक संपत्ती हक्क, मानसशास्त्रीय कसोट्या आणि मोजमाप, संशोधन पध्दतीची मूलतत्वे, संशोधनासाठी संबधित साहित्य आणि ग्रंथसूची लेखन, संशोधन प्रस्ताव लेखन, एस.पी.एस.एस. व्दारे संशोधन माहिती विश्लेषण, संशोधन अहवाल आणि पेपर लेखन असे हे नवीन प्रमाणपत्र शिक्षणक्रम सुरू होणार आहेत. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर त्यासाठी लिंक देण्यात आली आहे. अशी माहिती या विभागाच्या प्रभारी संचालक डॉ. मनिषा इंदाणी यांनी दिली.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक:१४ मार्च, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी